**निशाणी क्र. ६० वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी याने त्याचे विरुध्द प्रतिवादींचे प्रतिदाव्यावर कैफियत न दिल्यामुळे झालेला विना कैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे म्हणणेनुसार त्यास कागदपत्रांची जमवाजमव करणेस काही कालावधी लागला. सदरची कागदपत्रे हस्तगत करुन वकीलांशी संपर्क साधुन कैफियत मुदतीत देवू शकले नाहीत. त्यामुळे नैसर्गिक न्यायपूर्ततेच्या दृष्टीने झालेला विलंब माफ होवून त्याचेविरुध्द झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द होवून कैफियत स्विकारण्याची विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करुन सदर अर्ज मंजूर करणेस हरकत घेतली आहे व अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

३. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. वादी याने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन त्याच्या अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने प्रस्तुतचा दावा हक्कठराव व निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वाटपाकरीता प्रतिदावा दाखल केला आहे. वादी व सदर प्रतिवादी यांचेमध्ये असलेले वादाचे निराकरण याच दाव्याचेकामी गुणावगुणावर होणे आवश्यक आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता वादी यास प्रतिदाव्यास कैफियत सादर करण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत वादीने सदर प्रतिवादींना खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

**— आदेश —**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादी यास प्रतिदाव्यास कैफियत दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. वादी याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ४००/— दयावी. त्याने त्यापैकी रक्कम रुपये २००/— प्रतिवादी क्र. १ ते ४ यांना दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड ( गि. सु. माने )
दिनांक : ०७/०६/२०१७ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.